# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निववि/२४७ दिनांक : २३ एप्रिल, २०२५

प्रति,
मा. अध्यक्ष,
संबंधित नियमित व तदर्थ अभ्यासमंडळे

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'अभ्यासमंडळ कार्यशाळा आयोजन' अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढीबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. १) साफुपुवि/निववि/२१३ दि. २१/०३/२०२५**
**२) साफुपुवि/निववि/२३८, दिनांक ०८/०४/२०२५**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत, **'अभ्यासमंडळ कार्यशाळा आयोजन'** या योजनेसाठी संदर्भ क्र. १ अन्वये ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात आले होते. संदर्भ क्र. २ नुसार सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास **बुधवार, दिनांक १६/०४/२०२५** पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

या पत्रान्वये सदर प्रस्ताव सादर करण्यास पुनःश्च एकदा **बुधवार दिनांक ३० एप्रिल, २०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ** देण्यात आली असून ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत व त्यासोबत मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून सोमवार **दिनांक ०५/०५/२०२५** पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—For Teachers Login & Password—Planning and Development**

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करतांना काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास **collegesupport@pun.unipune.ac.in** या ईमेल आयडीवर अथवा **०२०—७१५३३६३३ या** दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही. मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना बंधनकारक राहतील.

**ज्या अभ्यासमंडळांच्या अध्यक्षांनी यापूर्वी अर्ज केले असतील त्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.** याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपली विश्वासू,
23/4/25
डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)